# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी. : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ 175

दिनांक : १२.१.२००१

## परिपत्रक क्र.- ५०

विषय : ग्रामीण पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत..

दिनांक ३१.३.२००१ अखेर साधारणतः किती ग्रामीण पाणी पुरवठा योजना कार्यान्वित होऊ शकतील याचा आढावा घेण्यात आला असता असे निदर्शनास आले की, १४५ ग्रामीण पाणी पुरवठा योजना ३/२००१ पर्यंत कार्यान्वित होऊ शकतील व यासाठी किमान रु.१० कोटी निधीची आवश्यकता भासेल. उपरोक्त १४५ ग्रामीण पाणी पुरवठा योजना गुणवत्तेवरुन प्राधान्य क्रमांक १ वा २ मधील असाव्यात (ही धारणा निश्चीत करावी) व यासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. मात्र असे करत असतांना या योजनांबाबत खालील अत्यंत महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

अ) <u>योजनांचे स्त्रोत कोरडे पडणे.</u>

या वर्षी राज्यात बऱ्याच ठिकाणी अवर्षणप्रवण स्थिती आहे. त्यामुळे सर्वसाधारणतः योजनांचे स्त्रोत कोरडे पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा पाणी पुरवठा योजना पूर्ण / कार्यान्वित करुनही उद्देश साध्य होणार नाही व निधी मात्र खर्ची पडेल असे प्रकार टाळणे अत्यंत आवश्यक आहे. उपलब्ध होऊ शकणारा निधी अत्यंत कमी असल्याने तो ज्या योजनांद्वारे लाभार्थींना लाभ मिळू शकेल अशा योजनांसाठीच वापरणे व्यावहारीक ठरेल. त्यामुळे ज्या योजना कार्यान्वित करावयाचे प्रस्तावित आहे त्यांच्या स्त्रोताबाबत अधीक्षक अभियंता यांनी स्वतः खात्री करुन घ्यावी व खात्रीचा स्त्रोत असणाऱ्या व योजना (ज्यांचे स्त्रोत या उन्हाळयात आटणार नाहीत) कार्यान्वित करण्यास परवानगी द्यावी अन्य योजनांचा विचार भविष्यात करणेच संयुक्तिक ठरेल.

ब) <u>पंचायत राज संस्थांनी हस्तांतरण करणे.</u>

बहुतांश वेळा असे निदर्शनास आले आहे की, योजना कार्यान्वित होऊन पाणी पुरवठा सुरु झाला असला तरी योजनेतील सर्व कामे पूर्ण झालेली नाहीत या सबबीखाली योजनांचे हस्तांतरण स्थानिक स्वराज्य संस्थांकडून टाळण्यात येते व या योजनेतून पाणी पुरवठा सुरु झालेला असल्याने नागरिकांच्या दबावाखाली योजना प्राधिकरणास चालवावी लागते तसेच यासाठी खर्चही करावा लागतो ज्याची तरतूद मंजूर योजनेत नसते.

या अनुषंगाने आपणास निर्देशित करण्यात येते की, ३/२००१ पर्यंत ज्या योजना कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे त्या योजना कार्यान्वित झाल्यानंतर त्वरीत स्थानिक स्वराज्य संस्था हस्तांतरीत करुन घेणार असतील तरच या योजनांवर खर्च करणे व्यवहार्य ठरेल अन्यथा योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरवावे लागेल व यासाठी निधी उपलब्ध होऊ शकणार नाही ही वस्तुस्थिती विचारात घेतल्यास असे उद्दिष्ट ठरविणे अशक्य आहे म्हणजेच प्राप्त परिस्थितीत योजना कार्यान्वित करण्याचे जे धोरण ठरविण्यात आले आहे त्याच्या अधिन राहूनच कार्यवाही करावी लागेल याची नोंद घ्यावी. कार्यान्वित झालेली योजना (सर्व कामे पूर्ण झालेली नसली तरी) स्थानिक स्वराज्य संस्था हस्तांतरीत करुन घेतील अशी हमी त्यांचेकडून घेण्यात यावी व करारपत्र करण्यात यावे व त्यानंतरच त्या योजनांवर खर्च करुन योजना ३/२००१ पर्यंत कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात यावा. याबाबत अधीक्षक अभियंता यांनी स्वतः आढावा घेवून कार्यवाही सुरु करावी.

वरील अटींसह

उपरोक्त सूचनांनुसार आपणाकडून कार्यवाही करावी व ३/२००१ पर्यंत कार्यान्वित होऊ शकणा-या योजनांची सुधारित यादी निधीच्या आवश्यकतेसह संबंधीत मुख्य अभियंता यांनी संकलित करुन त्वरित सादर करावी.

प्रत्येक योजनेबाबत वरील दोन निकष पूर्ण होतील की, नाही ते लिहावे.
उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन व्हावे याची नोंद घ्यावी.

(राजेंद्र खगावे) १५/१/२००१
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,
मा.मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांचे माहितीसाठी सादर.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर.
सदस्य सचिव (प्रशासन व बाह्य अर्थसहाय्य), म.जी.प्रा., मुंबई यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नवी मुंबई यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा. यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई यांचे माहितीसाठी.
सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, यांचे माहितीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.वां.विभाग, यांचे माहितीसाठी.

एसकानी.९२१

M. J. P.
ISSUED
17 JAN 2001
MUMBAI-21